(Marathi)

१०५० / ९|२१

1550

72

P

खान्देशचे विजयी विर

शहीद - सिद्राम बसप्पा मुचाटे धुळे

श्री सीताराम प्रेस आमळनेर मध्ये

छापलेले

1550 Mar

IMPERIAL RECORD DEPARTMENT
RECEIVED.
6 JAN 1931
1550 Mar

॥ जयभवानी ॥

# बोला कोण कोण लढणार ?

NATIONAL ARCHIVES LIBRARY
1550
17.1.72
Date
GOVT. OF INDIA

( चाल – हर हर महादेव बोला )

स्वातंत्र्य वीर बंधूंनो, बोला कोण कोण लढणार ?
तरुण हो कोण कोण उठणार ? ॥ धृ० ॥
आजवरी केला वक्तृत्वानें, लेखणीनें भडिमार ।
कसोटीचा अजि दीन पातला, सत्य कोण ठरणार ॥१॥
दडपशाहीची गोळी सुटली, खाक तुम्ही होणार ।
त्या गोळीस्तव ढाल छातीची कोण कोण करणार ॥२॥
कुटील कायदा कांटा रुतला, माय बाप सरकार ।
कांट्यालागीं फांटा देऊनि, कधीं मुक्त होणार ? ॥३॥
स्वातंत्र्यास्तव लढले पूर्वज, सिंहाप्रत अनिवार ।
वंशज त्यांचे धुर्कट भुर्कट, पिलां काय डरणार ? ॥४॥
इरेस पडला मोहरा तुमचा, तरुणांचा सरदार ।
लाल जवाहिर अटक जाहले, स्वस्थ काय बसणार ॥५॥
करबंदीचा ठराव सांचा, तुमचा प्राण आधार ।
यास्तव झाले अटक तरी कां करां तुम्ही भरणार? ॥६॥
बाप जयाचा समरीं पडला, गाजवितां तल्वार ।
पुत्र तयाचा म्हणुनी मग कां, मरणाला भिणार ? ॥७॥

राष्ट्रध्वज हा स्फुरवित सकलां, "करा जरा सुविचार" ।
अखिल हिंदुनों इस्लामांनों, व्हाच आतां तय्यार ॥८॥
पंजाबाचा केसरी लाला, झाला ज्यास्तव ठार ।
विजयध्वज तो आज फडकला, घेऊं नका माघार॥९॥
चिर शांतीनें विजय आपुला अखेरीस होणार ।
राष्ट्रीय शाहीर सिद्रामाचे बोल सत्य ठरणार ॥ १० ॥

# नारायण विजयी झाला !

( चाल – उद्धवा शांतवन. )

स्वातंत्र्य संगरीं लढला । नारायण विजयी झाला ॥धृ०॥
फुंकिली जयें रणभेरी । एप्रील एकवीसावीला ।
ऐकुनियां आली घेरी । लटपटला टोपीवाला ।
ही नरवीराची स्वारी । वैद्य नांव साजे ज्याला ।
लागला रोग शत्रूला
साम्राज्यशाही वाल्याला
निज – मात्रा देण्या त्याला
वैद्यराज आपुला गेला । नारायण विजयी झाला १.
लागली झोंप बहु होती । ज्या धुळें लोकशाहीला

घालुनियां अंजन नेत्रीं । उठविलें जयानें तिजला
खडबडुनी जागे होती । स्वातंत्र्य लढा लढण्याला
सजविली हिंदवी सेना
नोकरशाहीची दैना
मदिरेचा उडवित फन्ना
घाबरला गुत्तेवाला । नारायण विजयी झाला २.
पाहुनियां नरवर ऐसा । खुष झाली परकीय बाला
करीं घेऊनियां मग शेला । धुंडते नवरदेवाला
परि ठाऊक नव्हतें तिजला । कीं तोही सिद्धचि झाला
लागलें वेड पोरीला
खान्देश सर्व धुंडीयला
परि पडली गांठ धुळयाला
घातली तियेनें माला । नारायण विजयी झाला ३.
नवरदेव ऐसा सजला । वैशाख शुद्ध तृतियेला
मग सत्याग्रह शिबिरांत । परणायास्तव जो गेला
पातले सकल प्रिय मित्र । जणुं वऱ्हाड ये लग्नाला
मंगल वाद्यांचा नाद
दुमदुमला सर्व धुळ्यांत
ऐशा त्या जयघोषांत
मिरवीत वीर जो निघला । नारायण विजयी झाला ४.

पुष्पांचे घालुनि हार । पोशाक तया वीती
किती 'वंदेमातरम्' वदती । कुणी छायाचित्रें घेती
बालिका पुजा किती करिती । कुणी श्रीफल हातीं देती
किती सुवासिनी बरतोनी
पुष्प अक्षता फेकोनी
शुभ आशिर्वाद देवोनी
नमुनि त्या सर्व भगिनींला । नारायण विजयी झाला ५.
पोहोंचतां मंडपा जवळीं । तरुवरती चढुनि वदला
जणुं कृष्ण द्वारकाधीश । दे निरोप निज मित्रांला
" वरूनियां नागकन्येला । मर्दिन मी कालियाला
परि एक विनंती सकलां
तुम्ही पूर्ण शांतता पाळा
श्रीदास न आपुल्या ढाळा "
मग मंडपांत जो शिरला । नारायण विजयी झाला ६.
बैसला बोहल्या वरती । मंगलाष्टकें सुरू झालीं
फौजदार, पोलीस, जज्ज । जणुं ब्राह्मण भटजी आली
लग्नाच्या भरल्या घटिका । लागली विराची टाळी
पोहोंचला श्वशूर गृहाला
खाण्या पाहुणचाराला
जामात निघुनियां गेला

जिंकुनि निज नवरीला । नारायण विजयी झाला ७.

राष्ट्राचा तडकुन तारा । वीराचा ठरला वीर
साक्षीदार खाती वारा । अधमाधम ठरले चोर
हे बगलबच्चे परक्यांचे । म्हणुनिया घेती कैवार
जे दंड खंड झालेले
शिक्षाही भोगुनि आले
असे नालायक ठरलेले
ते लायक हो साक्षीला । नारायण विजयी झाला ८.

बहु वऱ्हाड आटोकाट । दाटले नवरदेवाचे
थरथरले बघुनी त्यांना । मग वऱ्हाड तें नवरीचे
बंदुकिच्या देती ढुसण्या । गर्दींत शिरुनियां मग जे
जगीं श्रेष्ठ म्हणुन नवऱ्याचा
अपमान होय आजि त्याचा
परि राग न कोणा ह्याचा
वदनात शांतता ह्याला । नारायण विजयी झाला ९.

लग्नाचें आपुलें कार्य । बहुतेक संपले पार
राहिली वरातचि आतां । आठ महिन्यांनीं निघणार
त्या वरातीचि तैयारी । तुम्ही कशी काय करणार?
पोशाक खादीचा शुद्ध
करणें हें आपुलें ब्रीद
यापरी दुजें नच युद्ध
या शाहीर सिद्रामाला ; । नारायण विजय झाला १०

# श्री कृष्ण करील विध्वंस.

( चाल :— असा धरी छंद. )

मातला कंस, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ धृ० ॥
शांततेच्या स्वातंत्र्योद्धीं
कंस घेत वीरांची आहुती
विनाश कालें विपरीतबुद्धी
सुचली त्यास, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ १
गांधी रूपानें प्रभु अवतरला
जुलमी सत्ता ताडायाला
तयार होतां धाक पडियला
गोऱ्या कंसास, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ २ ॥
धारासनेवर करण्या हल्ला
कृष्णराज हो तयार झाला
अवचित जाउनि घाला पडला
मध्यरात्रीस, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ३ ॥
अनितीशाही चालू करुनी
कृष्णासह गोपाळां धरुनी
कंस टाकितो बंदी खानीं
पापांची रास, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ४ ॥

रळी घेतले पैसें कितीकां
धुळें शहरचा प्रकार ऐका
सात जणांचा साधुनि मोका
आठवा खास, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ५ ॥
शंकर नामें गोपालाला
फौजदार तो घेण्या आला
अक्रूर जैसा श्रीकृष्णाला
नेत मथुरेस, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ६ ॥
मोटारीचा रथ हा सजला
राष्ट्रध्वज वरती फडफडला
शंकर जमई सज्ज जाहला
वधू जिंकण्यास, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ७ ॥
मिरवीत मिरवित वीर जो जाई
पुष्पांचा वर्षावची होई
वाहूी अक्षता सुवासिनीहूी
अशा समयास, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ८ ॥
वीराची वीरपत्नी आली
कडकडुनीया मिठी मारली
वीर पत्नी ओवाळूं लागली
अपुल्या पतिस, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ९ ॥

कंसाचा दरबार थाटला ।
कृष्णलिलेचा न्याय चालला
नाटकशाळा वाटे मजला
बघुनिया तीस, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ १० ॥
आसुरी सत्ता न्याय ही आसुरी
एक वर्षाची सक्त मजूरी
सिद्रामाचा थाट शाहिरी
गाल कवनास, श्रीकृष्ण करील विध्वंस ॥ ११ ॥

## खादी गीत.

( चाल — खादी स्वदेशी. )

खादी सुबोधी ! किति साधी ही ! ॥ ध्रु ॥
स्वातंत्र्य देवी खरी हिंदभूची ।
अहो राजलक्ष्मी असे भारताची ॥ १ ॥
करी ऐक्य लोकीं, सुलोकीं बरी ही ।
त्यजायास हो सिद्ध परतंत्रता ही ॥ २ ॥

(614)

Shavlalaunaya Sangramsinh

Khvinjilohe Vijay

[illegible]